2017-18

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

23/2017

Volume - 4 No. : 2 Issue - 11 May-Aug.2017 ISSN No. :2347-9639

# VICHAR MANTHAN

34 Years

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

## Reservation : Movements and Reality




IIJIF Impact Factor 2.283

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

## आरक्षण : आंदोलने व वास्तवता

330

|अथर्व|

मुख्य संपादक - प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
संपादक - डॉ. प्रमोद पवार | डॉ. मनोहर पाटील

Scanned with CamScanner

# ✲ अनुक्रमणिका ✲


- **Reservation Issue of Minority Communities in India** ........ ०७
  - Dr. Vidya S. Raut, Akola
- **Social Justice & Reservation in India** ........ १०
  - Dr. Shriniwas Bhong, Sangamner
- **Muslim Reservation is Vote Bank Politics** ........ १२
  - Prin Dr. Pramod Pawar
  - Prof. Vaqar R.Shaikh, Jalgaon
- **Globalisation and Affirmative Action in India** ........ १४
  - Dr Vaibhav R Suryawanshi, Bhor, Dist –Pune
- **Indian Federalism -Claims for New States** ........ १७
  - Dr. Kanti Kiran David, Khandwa (M.P)
- **आरक्षण आंदोलन एक अवलोकन** ........ २०
  - डॉ. महिमा बाजपेयी, खण्डवा (म.प्र.)
- **आरक्षण आन्दोलन का इतिहास एक दृष्टिकोन** ........ २२
  - डॉ. सुनीता कविश्वर, खण्डवा (म.प्र.)
- **आरक्षण आंदोलन हरियाणा के विशेष संदर्भ में** ........ २४
  - डॉ कृष्णा सोलंकी, खण्डवा (म.प्र.)
- **आरक्षण आंदोलन एक समीक्षा (पाटीदार आंदोलनों के विशेष संदर्भ)** ........ २६
  - डॉ.एस.के.गोयल, खण्डवा (म.प्र.)
- **आरक्षण एवं ऐतिहासिक अवलोकन** ........ २९
  - डॉ. अर्चना पाटिल, सावनेर, महाराष्ट्र
- **आरक्षण** ........ ३२
  - प्रा. सरला वसंतराव मेश्राम, उमरेड
- **मराठा क्रांती मोर्चे : एक चिंतन** ........ ३५
  - डॉ. व्ही.एल. एडे, निलंगा
- **आरक्षण आणि वास्तवता** ........ ४१
  - प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, कर्जत,
  - प्रा. प्रदीप जगताप, कर्जत
- **भारतीय संविधान आणि मराठा आरक्षण** ........ ४३
  - प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर, मेहकर
- **अनुसूचित जमातीचे राजकीय आरक्षण (विशेष संदर्भ – नंदुरबार जिल्हा )** ........ ४७
  - प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, अमळनेर
  - धनराज पाटील, नंदुरबार
- **प्रतिनिधीत्वाचा मुद्दा : महिला आरक्षण** ........
  - माधव चोले, देगलूर, जि.नांदेड.




Scanned with CamScanner

# भारतीय संविधान आणि मराठा आरक्षण

- प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर
मेहकर

**प्रस्तावना**

मराठा समाजाला आरक्षण देणारी मागणी आजची नसून त्याला एक इतिहास आहे. १९१८ मध्ये साऊथबरो कमिटीच्या वेळी राजर्षी शाहू महाराज यांनी मराठ्यांसाठी आरक्षणाची मागणी केली होती. शाहू महाराजांच्या दुरदृष्टीची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. त्यामुळेच त्यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीचे समर्थन केले होते. २७ जानेवारी १९१९ रोजी बाबासाहेबांनी साऊथबरो कमिटीला दिलेल्या लिखित मतामध्ये मताधिकाराच्या संदर्भात मराठा जातीला विशेष सवलत द्यावी असे नमूद केले होते. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळालेच पाहिजे यासाठी ते आग्रही होते. १९२० च्या सुधारित कायद्यानुसार ब्रिटिश भारतातील मुंबई व मद्रास प्रांतातील आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या जातीच्या अधिकारांना मान्यता देण्यात आली. त्यानुसार मुंबई प्रांतातील मराठा समाजाला आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले म्हणून राजकीय प्रतिनिधीत्व देण्यात आले, हे येथे उल्लेख करण्याचे कारण असे की मराठा समाज हा आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास आहे, याचे पुरावे ब्रिटिशकालीन दप्तरी आढळतात. याच मराठा समाजातील कुणबी समाजाला मंडल आयोगाने इतर मागासवर्गात समाविष्ट केले पण जो मराठा समाज मूळ कुणबी आहे त्यांना मात्र या वर्गवारीतून वगळणारा अन्यायकारक निर्णय घेतला. त्यामुळे साहजिकच १९९० पासून मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीने जोर धराला.

आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या दलितांप्रमाणेच कुणबी-मराठा समाजसुध्दा शोषित, पीडीत असल्यामुळे ते समदुःखी आहेत, म्हणूनच या समाजाने शोषणमुक्तीसाठी एकत्रिपणे संगठित व्हावे, अशी बाबासाहेबांची इच्छा होती. त्यांनी दलितांच्या उध्दार कार्याबरोबरच कुणबी-मराठा समाजाच्या उध्दारासाठी कार्य केले. संविधानात केलेल्या तरतुदी त्याचाच एक भाग आहे. संविधानातील कलम ३४० अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असणाऱ्या वर्गाच्या परिस्थितीची पाहणी करून त्यांच्या अडचणी व समस्यांच्या शिफारशी करण्याविषयी आयोग नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला. यानुसार १९५३ मध्ये भारत सरकारने काकासाहेब कालेलकर मागासवर्गीय आयोग नेमला, त्यानंतर १९७८ मध्ये बी.पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग स्थापन केला. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी मंडल आयोगाने महत्वपूर्ण शिफारशी केंद्र सरकारला सादर केल्या. पण चुकीच्या माहिती आधारावर त्यापासून मराठा समाजाला वंचित ठेवले.

मराठा समाजातील विविध संघटनांनी आरक्षणाच्या मागणीकरिता आंदोलने केल्यामुळे महाराष्ट्र सरकारने वेळोवेळी अनेक आयोग गठित केले. २००८ मध्ये न्यायमूर्ती बापट यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मागासवर्ग आयोगाने आपल्या शिफारशीत मराठा समाजाला इतर मागासवर्गात समाविष्ट करता येणार नाही, असे स्पष्ट केले. बापट आयोगाने केलेल्या शिफारशींचा फेरविचार करण्याची जबाबदारी न्या. सराफ आयोगाकडे दिली. त्यानंतर स्थापन झालेल्या भाटिया आयोगाने तर मराठा आरक्षणावर विचारच केला नाही, अखेर सरकारने नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून त्यांच्यावर अहवाल सादर करण्याची जबाबदारी सोपवली. त्यानुसार या समितीने महाराष्ट्रातील विविध मराठा संघटनांशी चर्चा करून आणि आर्थिक व शैक्षणिक बाजू तपासून सरकारी नोकऱ्या व शिक्षणात २० टक्के आरक्षण देण्याची शिफारस करून हा अहवाल मुख्यमंत्री चव्हाण यांना सादर केला. आगामी लोकसभा निवडणुका समोर असल्यामुळे महाराष्ट्र सरकार आरक्षणाबाबत काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या आरक्षणाबाबत निर्णय घेताना संविधानिक तरतुदींचा व वेळोवेळी आलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा विचार महाराष्ट्र सरकारला करावा लागणार आहे. संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये समानतेच्या मूलभूत अधिकारांचे वर्णन करण्यात आले. त्यातील कलम १६ मध्ये संधीची समानता प्रस्थापित करण्याकरिता समाजाचे जे घटक सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत, त्यांच्यासाठी आरक्षण किंवा विकासाच्या विशेष संधी वा संरक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारची राहील, अशी तरतूद आहे. म्हणजेच आरक्षण देत असताना त्या समाजाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाजू तपासणे गरजेचे आहे. मंडल आयोगाने ह्याच बाजू तपासून भारतातील विविध जातींचा समावेश इतर मागासवर्गात केला. सध्या अनेक कुटुंब असे आहेत की, ते मराठा आहेत पण त्यांच्या टी.सी.वर कुणबी किंवा नातेवाईक कुणबी असल्यामुळे ते इतर मागस वर्गवारीत आलेत आणि ज्यांच्या टी.सी.वर मराठा आहे त्यांना त्याचे फायदे मिळाले नांहीत. पण हे सर्व कुणबी आहेत हे नाकारता येणार नाही. सध्या वरील बाजू तपासून २० टक्के आरक्षण देण्याची शिफारस राणे समितीने केली.

इतर जातीचे होत असलेले सामाजिक व आर्थिक शोषण थांबविण्याकरिता त्यांना आरक्षण देण्यात आले. पण मराठा समाजाचे होत असलेले शोषण थांबविण्याकरिता अजूनही निर्णय घेण्यास होत असलेला विलंब त्या समाजाला सामाजिक न्यायापासून वंचित ठेवणारा आहे. जेव्हा-जेव्हा मराठा आरक्षणावर चर्चा होते तेव्हा-तेव्हा मराठा नेतृत्वाकडे असलेल्या राजकीय सत्ता पदांकडे बोट दाखविल्या जाते. पण मराठा समाजातील मूठभर घराण्याकडेच सत्तापदे आहेत आणि बहुसंख्य मराठे यापासून वंचित असल्याचे आकडेवारी दर्शविते. आजही मराठा समाज सामाजिक व आर्थिक, शैक्षणिक लाभापासून आरक्षणाअभावी वंचित आहे. मंडल आयोगाने भारतातील त्या जातींचा

समावेश इतर मागासवर्गात केला. त्या जातीतील नेते पूर्वीपासूनच सत्ता लाभ घेत होते. मग हा अन्याय मराठा समाजावर का? महाराष्ट्रातील काही समाजांचा राजकीय सहभाग चांगला असतानाही त्यांचा समावेश इतर मागास वर्गवारीत केला आहे. मराठा जातीचा इतिहास पाहता हा वर्ग मुळात कुणबी. कुणबी जातीचे लोक कष्टकरी, शेतमजुरी व अल्पप्रमाणात शेतमालक असल्याने विकासापासुन कोसो दूर आहेत. मुळात कुणबी असणाऱ्या मराठा समाजाला विकासापासून दूर ठेवण्याचे षड्यंत्र आखले जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व घटनासमितीची आरक्षणाबाबतची भूमिका संविधानिक तरतुदी तसेच मागासलेल्या जातीकरिता सरकारकडून केले जाणारे प्रयत्न पाहता आरक्षण मराठा समाजाचा संविधानिक हक्कच बनतो. सामाजिक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या मराठा समाजाला आरक्षण दिले तरच संविधानिक समानता प्रस्थापित करता येईल अन्यथा समाजातील मोठा वर्ग हक्कापासून वंचित राहील आणि सामाजिक न्यायाच्या आंदोलनाची परंपरा कायम राहील. संविधान आणि सद्यकालीन आरक्षणाचे राजकारण, संघर्षमय वर्ण व्यवस्थेची आमची परंपरा आधुनिक युगातही कायम असल्याचे भारतीय राजकारण दर्शविते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न संविधानाने केला. मात्र अंमलबजावणीतील दोषांमुळे आणि जातीच्या आधारावर राजकीय पक्ष निर्माण झाल्यामुळे जातीवाद भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आला. घटना समितीने मागासलेल्या जातींना प्रवाहात आणण्याकरीता आरक्षणाची तरतुद केली. आरक्षण का व कशासाठी आणि जातीय की राजकीय याबाबत सर्वांगाने चर्चा केल्यानंतर ती तरतूद संविधानात करण्यात आली. आज आरक्षण हे सत्ता प्राप्तीचे आणि जातीय संघर्षात वाढ करणारे साधन बनले किंबहुना ते सामाजिक व राजकीय व्यवस्थेने बनविले. आमचे सामाजिक व्यवहार जाती व्यवस्थेने निश्चित केले. त्याचा परिणाम राजकीय व्यवहारही जातीपातीत अडकले. जातीय राखीव मतदार संघाचा परिणाम मतदारही जातीनिहाय विभागले. ज्या उद्देशाने राखीव मतदारसंघ निर्माण केले तो बाजूला पडून त्या-त्या जातीच्या नेत्यांना व्यासपीठावर मिरवून राजकीय पक्षात मोठी पदे देऊन संबंधित जातीच्या मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिवशक्ती-भीमशक्ती, शिवाजी महाराज, डॉ. आंबेडकर या थोरांच्या स्मारकाचे राजकारण त्याचीच उदाहरणे आहेत. संत, महापुरुषांना जाती धर्मात विभागल्यानेच महाराष्ट्राचे वाटोळे झाले, असे मत ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले होते.

सद्यकालीन भारतीय राजकारणाचा वेध घेतल्यास अनेक गोष्टी समोर येतात, जसे की, हैद्राबाद विद्यापीठातील विद्यार्थी रोहित वेमूलाने आत्महत्या केली, रोहित हा पीएच.डी. चा विद्यार्थी होता आणि तो एका विद्यार्थी संघटनेचे कार्य करीत होता. दोन विद्यार्थी गटात झालेल्या वादाचा परिणाम म्हणून रोहितसह चार विद्यार्थ्यांना निलंबित करण्यात आले. त्यानंतर रोहितने गळफास घेवून आत्महत्या केली, त्याचा निषेध म्हणून विद्यार्थ्यांनी मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या मुख्यालयासमोर सरकार विरोधात प्रदर्शन, विद्यार्थ्यांनी सामूहिक उपोषणही केले. या आंदोलनात राहुल गांधी यांनी गरज नसतांना सहभाग घेऊन नऊ तास उपोषण करुन त्याला राजकीय रंग दिला. यापूर्वी कॉंग्रेसची सत्ता असताना भाजप नेत्यांनीही असेच केल्याची उदाहरणे आहेत. हे प्रकरण अति चिघळल्यामुळे सरकारने उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश यांच्याकडे चौकशी सोपविली. या आयोगाचा अहवाल आल्यानंतर सत्य बाहेर येईलच. पण या प्रकरणाने अनेक प्रश्न उपस्थित केले. एक विद्यार्थी संघटनेतील वादातून विद्यापीठाच्या कारवाईनंतर आत्महत्या करतो, त्याकडे मानवतेच्या दृष्टीने न बघता तो दलित आहे, हा दलितांवरील अन्याय आहे या दृष्टीने राजकारण तापविले जाते. राजकीय पक्षांमध्ये विद्यार्थी आत्महत्येवरून कलगीतुरा रंगतो. आम्ही एक तरुण विद्यार्थी गमविला याचे दुःख अधिक, त्याला जबाबदार राजकीय पक्षांनी पोसलेल्या विद्यार्थी संघटना जबाबदार ठरतात. ज्याप्रमाणे राजकीय पक्ष जातीवादाला खतपाणी घालतात, त्याप्रमाणे त्यांची पिलावळ विद्यार्थी संघटना त्याच वाटेने मार्गक्रमण करीत असल्याचे हे प्रकरण दर्शविते. आज हैद्राबादमध्येच नव्हे तर भारतातील सर्वच विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये जातीवाद वाढतो आहे, तरूण वर्गात वाढणारा असा जातीवाद राष्ट्रीय एकात्मतेला घातक ठरतो आहे, म्हणून महाविद्यालये जातीय विषमता नष्ट करणारी साधने बनावत. सध्या देशात एखादे प्रकरण घडले की, त्या प्रकरणातील माणसाची जात शोधून राजकीय आखणी केली जाते. हे असे शाहू, फुले आंबेडकरांना अपेक्षित आहे का?

देशाचे विभाजन करण्यासाठी दलितांच्या मुद्यांवरून खोटा प्रचार केला जात असल्याचा आरोप तामिळनाडूतील कोईम्बतूर येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला. ओबीसी आणि दलित आरक्षण मोदी सरकार रद्द करणार असल्याचा अपप्रचार केला जात आहे, असे पंतप्रधान म्हणाले. कामगार, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी हे सर्व दलित बहुजन आहेत असे डॉ. आंबेडकर म्हणतात. मात्र राजकारणाने दलिताची व्याख्या जातीनुसार निश्चित केली. दलित, मागासवर्गीय, मुस्लीम व त्यांचे आरक्षण हा राजकारणाचा मुद्दा बनला असून प्रत्येक राजकीय पक्ष त्याचा अपप्रचार करीत आहेत. अन्याय झाला त्यापेक्षा अन्याय झालेला कोणत्या जातीचा याला अधिक महत्त्व देऊन न्यायाचा अर्थ राजकीय पक्ष लावत आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून सत्ताधारी पक्षाला घेरण्याकरिता दलित आणि आरक्षण साधन म्हणून वापरले गेले. समाजातील विविध वर्ग वारंवार आरक्षणाची मागणी करतात, त्याकरिता वणवा पेटविला जातो. सार्वजनिक संपत्तीची हानी होते.

सुरुवातीला भारतीय संविधानाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना आरक्षण दिले, त्यानंतर जातीय राजकारणाने वेग घेतला. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना आरक्षण देण्यात आले. तेव्हापासून इतर मागासवर्गीय वर्गामधून सुटलेल्या अनेक जाती आरक्षणाची मागणी करीत आहेत. कारण आयोगाने इतर मागासवर्गीयांना जे निकष लावले ते उर्वरित मागास जातीच्या मुळापर्यंत जाऊन लावले नाहीत, असा त्यांचा आरोप आहे. मराठा, पटेल व कापू इत्यादींना मागास वर्गवारीतून वगळले, परिणामी हा वर्ग वारंवार वेगळ्या पध्दतीने आरक्षणाची मागणी करीत असतो. महाराष्ट्रात मराठा, गुजरातमध्ये हार्दिक पटेल यांच्या नेतृत्वात पटेल समाजाचे आंदोलन आणि सध्या आंध्र प्रदेशातील कापू समुदायाला इतर मागासप्रवर्ग कोट्यातून आरक्षणाची मागणी जोर धरत आहे अनेकदा या मागण्यांनी हिंसक वळण घेतले.



Scanned with CamScanner

वेळोवेळी घटकराज्य सरकारांनी आपआपल्या राज्यातील वेगवेगळ्या जातीतील काहींना स्वतंत्र, तर काहींना इतर प्रवर्गात समाविष्ट करून आरक्षण दिले. या धोरणामुळे मतदारांची जातीय बांधणी करण्यात राजकीय पक्षांना यश आले.

आरक्षणाच्या एकूण टक्केवारी बाबत न्यायालयाने निर्देश दिल्यानंतरही त्याकडे दुर्लक्ष करुन सरकारे आरक्षणाची अंमलबजावणी करीत आहेत. देशभरातील उच्च शिक्षण संस्थांमधून सर्वच प्रकारचे आरक्षण कायमचे हद्दपार करण्याची गरज आहे. देशाचे हित जोपासण्यासाठी केंद्र सरकारला ठोस पावले उचलावीच लागणार आहेत, असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. (ऑक्टोबर २०१५). यापूर्वी १९८८ मध्येसुध्दा सर्वोच्च न्यायालयाने याबाबत निर्णय दिला होता. तरीही केंद्र व राज्य सरकारांनी याबाबत कोणतेही निर्णय घेतले नाहीत.

प्रसिध्द उद्योजक आणि दलित इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडिस्ट्रीजचे अध्यक्ष आणि अर्थसंकल्पपूर्व धोरणात्मक निर्णय घेण्यास सहभागी असणारे मिलिंद कांबळे यांनी एका मुलाखती दरम्यान देशातील आथिक प्रगतीचा सर्वाधिक लाभ दलितांनाचा झाला. देशात ५.७७ कोटी लघु व मध्यम उद्योग आहेत, त्यापैकी ८७ लाख उद्योग दलितांचे आहेत. २० कोटी लोकसंख्येपैकी ५० लाख लोक शासकीय सेवेत आहेत. समाजातील एक वर्ग कष्टात जगतोय त्यांना आरक्षणाची गरज आहेच. तीन वेळा आरक्षण घेणाऱ्यांनी चौथ्यांदा स्वत:हून ते टाळले तर गरजूंना फायदा घेता येईल. तसे न केल्यास डॉ.बाबसाहेबांनी आर्थिक सबलीकरणाबाबत मांडलेल्या विचारांना तडा जाईल, अशा आलेल्या प्रतिक्रिया आरक्षणाचे फायदे स्पष्ट करणाऱ्या आहेत, अशा प्रकारे आरक्षण व विविध योजनांचा फायदा होत असतांना त्यापासून वंचित वर्ग आरक्षणाची मागणी करतो, आर्थिक समानतेकरिता ती गरजेचीही आहे अशा वर्गाची मागणी योग्य असली तरी त्याचे जे राजकारण केले जाते त्याचे समर्थन करता येणार नाही. सध्या सुरू असलेल्या दलित आणि आरक्षणाच्या राजकारणामुळे समाजात संदेहाचे वातावरण निर्माण केले जाते. एका मर्यादेपर्यंत जातीचे समाजकारणासह राजकारण केले तर कदाचित सत्ता प्राप्त करताना अडचणी येतील, परंतु देशात मात्र शांतता नादू शकते. जात, धर्मापेक्षा देश मोठा आहे हे विसरता येणार नाही.

**जातीय भूमिकेतून शैक्षणिक - आर्थिक विकासासाठी आरक्षणाचे निकष**

हार्दिक पटेल यांच्या नेतृत्वात पटेल समाज आरक्षण आंदोलन मुद्दा भारतभर गाजत असतांनाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी आरक्षण धोरणाचा फेरविचार करण्याची वेळ आली, असे संघाच्या मुखपत्रात दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. ही प्रतिक्रिया आल्याबरोबर आरक्षांवर राजकीय वादळ निर्माण झाले. सर्वच राजकीय पक्षांकडून आरक्षणाबाबत प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली. या येणाऱ्या प्रतिक्रिया मागासलेल्या शैक्षणिक व आर्थिक घटकांचे मागासलेपण दूर करण्यासाठी आहेत की संविधनाला अपेक्षित आरक्षणाचे फलित आले का, यांचा आढावा या प्रसंगी घेणे गरजेचे वाटते.

मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना आरक्षण देण्यात आले. मंडल आयोगाने इतर मागासवर्गीयांना जे निकष लावले ते उर्वरित जातीच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असणाऱ्या वर्गाच्या मुळापर्यंत जाऊन लावले नाहीत. परिणामी कुणी समाजाला या वर्गवारीत समाविष्ट करीत असताना त्यांनी मराठा व पटेल या समाजाला जे मुळात कुणबी आहेत त्यांना वगळले. तेव्हापासून या दोन समाजाच्या आरक्षण मागणीने वेग घेतला. महाराष्ट्रात नारायण राणे समितीने मराठा समाजाला २० टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली, त्यानुसार काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी घाई-घाईने मराठा व मस्लीम समाजाला आरक्षण दिले ते एकूण ५० टक्केच्या वर गेल्यामुळे न्यायालयीन लढाईत अडकले. गुजरातमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदींनी पटेल समाजाच्या मतांवर राजकरण केले. तरीही त्या समाजास त्यांचा हक्क मिळवून देण्यास ते असमर्थ ठरले. सध्या नरेंद्र मोदी पंतप्रधानपदी असल्यामुळे पटेल समाजाला इतर मागासवर्गीयांत समाविष्ट करण्याची आशा होती पण तसे न घडल्यामुळे हार्दिक पटेल यांच्या नेतृत्वात आरक्षणाच्या मुद्यावर गुजरातमधूनच मोदी सरकारसमोर मोठे आव्हान उभे राहिले. हार्दिक पटेल या नवख्या नेतृत्वात हे आंदेलन इतके पेटल अशी अपेक्षा नरेंद्र मोदींनाही नव्हती पण पटेल समाजाच्या हक्कांसाठी सर्व समाज एकवटला. इतकेच नव्हे तर इतर जातीच्या मागासलेल्या शेतकरी वर्गाला त्यांनी एकत्र करुन त्यांचाही पाठिंबा मिळविला.

सप्टेंबर २०१५ मधील सरसंघचालक भागवत यांच्या प्रतिक्रियेनंतर लगेच दुसऱ्या दिवशी राजस्थान विधानसभेने आर्थिक निकषांवर आरक्षण जाहीर करुन ते एकूण ६८ टक्के वर नेले. सवर्णातील आर्थिक दृष्ट्या मागासांना शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये १४ टक्के आणि गुज्जर, गडीया, लोहार, रेबरी, बंजारा, गडरिया इत्यादींना मागास वर्गवारीत समाविष्ट करुन त्यांना ५ टक्के आरक्षण देण्यात आले. सध्या ज्यांचे उत्पन्न दीड लाखापर्यंत आहेत, अशांनाच या आरक्षणाचा लाभ मिळणार. आरक्षणाची टक्केवारी ५० टक्केवर जाऊ नये असे न्यायालयाचे स्पष्ट निर्देश असतानाही महाराष्ट्र सरकारनंतर राजस्थान सरकारने ही मर्यादा ओलांडली. आरक्षणाबाबत न्यायालयीन बंधने आणि त्या विरोधात जाऊन निर्णय घेणारे राज्य सरकार म्हणजेच ही मागासलेल्या घटकांची थट्टाच नव्हे का? एका बाजूला आम्ही मागास आहे म्हणून आंदोलनाद्वारे हक्क मागायचा, तो राज्य सरकारांनी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मान्य करायचा आणि नंतर न्यायालयीन लढाईत फेटाळायचा, हे असे किती दिवस चालणार याकरिता आरक्षणाच्या निकषांवर फेरविचार हा एकमेव मार्ग दिसतो.

आरक्षणाकरिता जातीय निकष लावायचे की आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण हा निकष लावायचा हे वादग्रस्त वाटत असले तरी परिस्थितीजन्य बनले. मागासलेल्या सर्वच जातींचा आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करणे हे संविधानचे उद्दिष्ट आहे, ते उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता समानतेच्या मूलभूत अधिकारांवर मर्यादा टाकून विशिष्ट वर्गाच्या विकासाकरीता तरतुदी करण्यात आल्यात. त्यालाच आपण आरक्षण म्हणतो. आरक्षणाची संविधानात तरतूद करीत असतांना ती फक्त सुरुवातीच्या दहा वर्षांकरता केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील आरक्षणाचा कालावधी वाढवितांना त्यावेळच्या काळजीचा उल्लेखही आपल्या भाषणात केला होता, पण [illegible] काँग्रेस

सरकारने हेतू पुरस्सरपणे दुर्लक्ष करुन तो कालमर्यादा वारंवार वाढविली. निश्चितच एकीकडे आरक्षणाची कालमर्यादा वाढवित असताना आरक्षित नसणाऱ्या पण शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांवर आरक्षणाचा काय विपरीत परिणाम होतो याचे भान ठेवणे गरजेचे होते. मात्र याकडे दुर्लक्ष करुन धोरण ठरविले गेले. परिणामी आजही धनगर समाज आरक्षणातील वर्गवारीकरिता संघर्ष करीत आहे. अनुसूचित जाती व जमातीला आरक्षण देवून ६५ वर्षांचा कालावधी लोटला. जवळ-जवळ एका पिढीने व त्यानंतर दुसऱ्या पिढीने आरक्षणाचा लाभ घेतला. येथे हा प्रश्न निर्माण होतो की जेव्हा एका पिढीने आरक्षणाचा फायदा घेऊन आपले शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण दूर केले तेव्हा त्याच घरातील व्यक्तीला शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गवारीत टाकावे का पण, जर आरक्षणाचा फायदा त्यांना पुन्हा त्याच वर्गवारीत टाकत असेल तर इतर वर्गवारीतील मागासलेल्या घटकांवर तो अन्याय नव्हे का? आरक्षणाचा फायदा किती कुटूंबांना झाला, आरक्षणाचा फायदा घेऊन मोजकीच कुटुंबे आपले मागासलेपण दूर करण्यात यशस्वी ठरल्याचे आकडेवारी दर्शविते. मागासलेल्या घटकांतील बहुसंख्यांकाचे दारिद्र्य व शैक्षणिक मागासलेपण कायम असेल तर त्यांना आरक्षणाच्या धोरणाचे औचित्य काय? सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी केलेली आरक्षणाची तरतूद सामाजिक विषमता वाढविण्यास कारणीभूत ठरली का? या सर्व बाबींचा फेरविचार करूनच आरक्षणाचे निकष निश्चित करावे लागणार.

आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण आरक्षित व अनारक्षित असलेल्या सर्वच जातींमध्ये आहे. आरक्षणाचा फायदा घेऊन आपले मागासलेपण दूर करणाऱ्या घटकांवर अनारक्षित असणारा पण, मागास घटक सहाजिकच नाराज होतो. परिणामी समाज व्यवस्था स्थिर होण्याऐवजी अस्थिर बनली, ही व्यवस्था अस्थिर करण्याचे श्रेय सामाजिक व राजकीय नेतृत्वाला जाते. कारण आरक्षण हे राजकारणाचे [illegible] बनविले. आरक्षणाचे मूळ उद्दिष्ट बाजूला पडले. प्रत्येक जातीचे ठेकेदार निर्माण झालेत. ते ठेकेदार फक्त आपल्या जातीचा तोही मर्यादित विचार करतो. आम्ही एकविसाव्या शतकातही जातीव्यवस्थेच्या बेड्यांमध्ये अडकलो. त्यातून बाहेर निघणे राष्ट्रीय एकात्मतेकरिता आवश्यक आहे. जातीव्यवस्था नष्ट करण्याकरिता शाळेच्या दाखल्यावरुन जात काढा असे वक्तव्य डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी यापूर्वीच केले होते. जातीव्यवस्था नष्ट करा, आरक्षण सोडतो असे वक्तव्य रामदास आठवले यांनी केले. आठवलेंनी कधी आघाडीसोबत तर सध्या महायुतीत राहून स्वत: सत्तापदे उपभोगिली, दलितांच्या मतांकरिता फक्त बाबासाहेबांचे नाव पुरेसे नसून त्यांना अपेक्षित समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट दलित नेत्यांसह इतरांनी स्वीकारावे, बिहार निवडणुक डोळ्यांसमोर असल्यामुळे भागवतांच्या भूमिकेवर लालुप्रसाद यादव, नितीशकुमार आक्रमक झाले, हे असे विषमता निर्माण करणारे राजकारण अजून किती वर्ष चालवायचे. आरक्षण हटविण्याची गरज नाही. मात्र आर्थिक निकषांवरही आरक्षण मिळायला हवे, असे काँग्रेस प्रवक्ते रमेश तिवारी यांचे मत आहे, याचा अर्थ काँग्रेस, भाजप व इतर पक्षांनी मिळून सर्व सहमतीने आरक्षणाचे नव्याने निकष निश्चित करावेत, जेणेकरुन संविधानास अपेक्षित सर्वच घटकांचे आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण दूर होईल. आरक्षण रद्द न करता राजकारणापलीकडे जावून सामाजिक बांधिलकी स्वीकारून आरक्षण धोरणाची न्यायपूर्ण अंमलबजावणी करावी, असे केले तरच न्यायालयीन अडचणी निर्माण होणार नाहीत.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) भारताचे शासन व राजकारण, अलका देशमुख, साईनाथ प्रकाशन नागपूर
२) [illegible], अशोक [illegible], अमित प्रकाशन पुणे
३) दैनिक लोकमत, नोव्हेंबर २०१५
४) [illegible], नोव्हेंबर २०१५


•••

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana